# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २२, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री**<br>**(८) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(९) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

## राज्यातील शाळांच्या संच मान्यतेबाबतचा दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीचा शासन निर्णय रद्द करणेबाबत

**(१) * ५२७६ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वी व ९ वी ते १० वी या स्तरावरील तुकडीमध्ये अनुक्रमे ३५ व ४० पैकी एकही विद्यार्थी कमी झाल्यास त्या स्तरावरील सर्व शिक्षक अतिरिक्त ठरत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही विद्यार्थ्यांअभावी त्या इयत्ता स्तरावरील सर्व शिक्षक अतिरिक्त होतात परिणामी उर्वरित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १५ मार्च २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अनेक शाळांच्या संच मान्यता शून्य पदांची दर्शविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासन निर्णय रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २६/०३/२०२५ अन्वये माध्यमिक शाळेतील गट ६-८ साठी असलेले निकष त्या गटातील २ किंवा ३ इयत्तेसाठी वेगवेगळे विचारात न घेता, संच मान्यता करतांना त्या गटामध्ये २ इयत्ता असल्यास व विद्यार्थी संख्या २० ते ३९ असल्यास १ पद, तीन इयत्ता असल्यास व विद्यार्थी संख्या २० ते ४९ असल्यास १ पद, ३ इयत्ता असल्यास व विद्यार्थी संख्या ४० ते ६० असल्यास २ पदे मंजूर करण्याबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) संचमान्यतेबाबतच्या शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ विरूध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.५४५६/२०२५ सह इतर याचिका दाखल झाल्या होत्या. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/११/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयान्वये सदर याचिका निकाली काढून शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ मधील तरतूदींना वैध ठरविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व विद्यापीठांमधील प्राध्यापकांची पदभरती करण्याबाबत

**(२) * ५००७ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय केणेकर, श्री.एकनाथराव खडसे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.योगेश टिळेकर, श्री.संजय खोडके, श्री.सत्यजीत तांबे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ११ पारंपारिक विद्यापीठांपैकी पुणे, मुंबई, नागपूरसह पाच विद्यापीठांत प्राध्यापकांच्या सुमारे ६० टक्के जागा रिक्त असल्याचे तसेच विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील सुमारे ११ हजार प्राध्यापकांची पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याने राज्यातील उच्च शिक्षण संस्थांचे राष्ट्रीय मानांकन घसरले असून या रिक्त पदांपैकी ५०१२ पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे तथापि, निधीअभावी भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरती होत असताना दुसरीकडे प्राध्यापकांच्या १२ हजारांपेक्षा जास्त जागा रिक्त असल्यामुळे अनेक प्राध्यापक हे पीएचडी नेट-सेट असूनही महाविद्यालयांत प्राध्यापक तासिका तत्वावर कंत्राटी पध्दतीने काम करित आहेत, गत ५ वर्षांत राज्यात केवळ २,०८८ पदांची भरती झाली असून उर्वरीत पदभरती करण्यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागास देणे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ११ विद्यापीठे व १,१७२ अनुदानित महाविद्यालयांमध्ये एकूण १२,५२७ प्राध्यापक पदे असूनही ४३७ महाविद्यालयांचे कामकाज प्रभारी प्राचार्यांद्वारे करण्यात येत असून प्राध्यापकांच्या रिक्त पदांमुळे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या अंमलबजावणीमध्ये समस्या निर्माण होत असल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठांचे शैक्षणिक उपक्रम आणि संशोधनावर अनेक वर्षांपासून पूर्ण पदभरती न झाल्याने परिणाम होत असून विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांच्या गुणवत्तेवर आणि विद्यार्थ्यांच्या निकालावर प्रतिकूल परिणाम झाला असून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि राज्य शासनाच्या संयुक्त मान्यतेने मंजूर केलेल्या पदांसाठी वित्त विभागाने निधी मंजूर करण्यास विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विभागाने सन २०१९ मध्ये दिलेल्या मान्यतेनुसार विद्यापीठांमध्ये केवळ ८० टक्के पदभरती झाली असून विद्यापीठांनी आपले प्रस्ताव शासनाकडे पाठविले असताना अद्यापही राज्यात १५ अकृषी विद्यापीठांमधील ११६६ पदे अद्याप रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सर्वच विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या वाढत्या रिक्त पदांमुळे कंत्राटी तत्वावर प्राध्यापक भरती केली जात असल्याचे तसेच विद्यापीठाच्या काही विभागांमध्ये एकही नियमित प्राध्यापक नसल्याने राज्यात सर्व विद्यापीठांमध्ये एकत्रित पदभरती करून उच्च शिक्षणाचा दर्जा टिकवण्यासाठी आणि राष्ट्रीय मानांकन सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक०३/१०/२०१८ च्या शासन निर्णयानुसार अनुदानित महाविद्यालयांतील रिक्त पदांपैकी ४० टक्के (३५८०) सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ३०८६ पदे भरण्यात आलेली असून उर्वरित ४९४ पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु आहे.

अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक ०१/१०/२०१७ रोजीच्या विद्यार्थी संख्येवर आधारित, अनुज्ञेय पदांनुसार माहे डिसेंबर, २०२४ अखेर सहायक प्राध्यापक संवर्गाच्या रिक्त पदांची संख्या ११९१८ इतकी आहे. अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सन २०१८ ते २०२४ या कालावधीत रिक्त झालेल्या ५०१२ सहायक प्राध्यापकांच्या भरतीस मान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(३) हे, खरे नाही.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या १२२७ मंजूर पदांपैकी ७७३ पदे भरलेली असून ४५४ पदे रिक्त आहेत. संबंधित संस्थांकडून प्राप्त झालेल्या पद भरतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. शासन निर्णय दिनांक १५/०३/२०१२ नुसार महाविद्यालयातील प्राचार्य पद रिक्त झाल्यास संबंधित महाविद्यालयातील अर्हता धारक प्राध्यापकांना प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठातील एकूण १४२२ रिक्त पदांपैकी ६२२ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, ४२२ पदांच्या भरतीसाठी मान्यता देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे. तसेच, अनुदानित महाविद्यालयातील ११९१८ रिक्त पदांपैकी ५०१२ पदांच्या भरतीस मान्यता देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे. तसेच, अध्यापकांच्या पदांची आवश्यकता भासल्यास शासन निर्णय दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावर नियुक्ती केली जाते. सबब, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या अंमलबजावणीमध्ये समस्या निर्माण होत असल्याचे खरे नाही.

(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये ८० टक्के पदे भरण्यास दिनांक ०७/०८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठांना मंजूर करण्यात आलेल्या अध्यापकीय पदांच्या ८५ टक्केच्या मर्यादेत अध्यापकीय पदे भरण्यास मान्यता देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य केल्याबाबत

**(३) * ४८९९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.सत्यजीत तांबे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) देणे अनिवार्य केले असून, शिक्षक भरती प्रक्रियेसाठी सध्या निर्माण झालेली अनिश्चितता यामुळे अनेक उमेदवारांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे, मा.सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालानंतर राज्यातील ६ लाख शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) द्यावी लागणार असल्याने शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी चिंता व्यक्त केली असून, विविध शिक्षक संघटनांनी शासनाने भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी याचिका क्रमांक १३८५ /२०२५ तसेच अन्य संबंधित याचिकांवर दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने टीईटी संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार इयत्ता १ ली ते ८ वी वरील सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकांमधील अनुदानित, अंशत: अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील एक लाखांहून अधिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले असल्याचे त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सन २०११ पासून टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असून दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या निकालानंतर सन २०१३ पूर्वीच्या शिक्षकांनाही टीईटी परीक्षा द्यावी लागण्याची शक्यता निर्माण झाली असून, ज्यांची सेवा पाच वर्षांपेक्षा जास्त शिल्लक आहे अशा ‘इन-सर्व्हिस’ शिक्षकांनी दोन वर्षात टीईटी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे असेही सूचित केले असल्याने विविध शिक्षक संघटनांनी या निर्णयाला विरोध दर्शविला असून, टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे या सक्तीच्या अटीमुळे अनेक उमेदवार वंचित राहतील, असा आक्षेप घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी द्यावा, शिक्षकांना टीईटी परीक्षेसाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे त्यामुळे त्यांना सर्व प्रकारच्या अशैक्षणिक कामातून शिक्षण विभागाने मुक्त करावे, परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रत्येक शिक्षकास सहा महिन्याची विशेष रजा मंजूर करावी, टीईटी पात्रता संपादन करण्यास अपयश आले तर शिक्षकांना दोन वर्षानंतर डिम्ड क्वालिफाईड समजण्यात यावे अशा मागण्यां शिक्षक संघटनांनी शासनास केल्या असून, टीईटी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची वैधता किती वर्षांसाठी राहणार आहे व शिक्षक पदांसाठी रिक्त जागा किती आहेत आणि त्या भरण्याबाबत

अंदाजे कालमर्यादा काय आहे व ज्यांची पाच वर्षापेक्षा कमी सेवा शिल्लक आहे अशांना टीईटी परीक्षेतून वगळले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, टीईटी बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी, विविध संघटनांच्या मागण्यां व शिक्षक भरती प्रक्रियेत आलेल्या अडचणी यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अलिकडील काळातील न्यायनिर्णयामुळे शिक्षक भरती प्रक्रियेत अनिश्चिता अथवा संभ्रमाची स्थिती निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कार्यरत शिक्षकांपैकी जे शिक्षक टीईटी उत्तीर्ण नाहीत, त्यांना सदर परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य असल्याने याबाबत शिक्षक संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कार्यरत शिक्षकांपैकी ज्या शिक्षकांची सेवा ५ वर्षाहून अधिक काळ शिल्लक आहे व जे शिक्षक टीईटी उत्तीर्ण नाहीत, त्यांना सदर परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य असल्याने शिक्षक संघटनांनी या निर्णयास विरोध करुन आक्षेप नोंदविला हे खरे आहे.
(४) शिक्षक संघटनांनी विविध स्वरुपाच्या मागण्या केल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार विहित मुदतीत शिक्षकांनी टीईटी परीक्षा उत्तीर्ण व्हावी म्हणून वर्षातून २ वेळा अशी परीक्षा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. टीईटी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची वैधता कायमस्वरुपी असणार आहे. सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार रिक्त पदांची आकडेवारी निश्चित करण्याची कार्यवाही आयुक्त (शिक्षण) स्तरावर करण्यात येत असून अशी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(५) मा.सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय आरटीई कायद्यातील तरतूदीनुसार पारीत झाला असल्याने त्याविरुध्द पुनर्विलोकन याचिका दाखल करता येणार नाही, असे अभिप्राय विधि व न्याय विभागाने दिले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सैनिकी शाळांना वाढीव टप्पावाढ अनुदान मंजूर करण्याबाबत

**(४) * ५८२५ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशभरात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात केंद्र शासनाच्या संरक्षण विभागामार्फत एकूण मान्यताप्राप्त ४१ नवीन सैनिकी शाळा कार्यान्वित असून त्यापैकी ४ शाळा महाराष्ट्रात आहेत, तसेच शासनाने दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजी टप्पावाढ अनुदान निधी वितरणाचा शासन निर्णय निर्गमित केला असूनही यामध्ये कुठेही सैनिकी शाळा किंवा हेड क्रमांक ५०२ चा उल्लेख करण्यात आलेला नसल्याने सन २०१८ पासून पुढील वाढीव टप्प्याच्या प्रतीक्षेत असलेल्या राज्यातील चार सैनिकी शाळांतील एकूण ४० शिक्षकांवर अन्याय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्व शाळांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित असून हे विद्यार्थी गुणवत्ताधारक आहेत, परंतु शैक्षणिक फी भरण्यास असमर्थ असल्याने सदर सैनिकी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत शासनाकडे अनेकवेळा पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सैनिकी शाळांचा टप्पावाढीसाठी समावेश न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त चार सैनिकी शाळांचा समावेश दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयात करून टप्पावाढ अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाल्यास हे विद्यार्थी दर्जदार शिक्षण घेऊन त्यांची पुढे NDA, MPSC, UPSC मध्ये निवड होऊन एनडीए तसेच संरक्षण क्षेत्रामध्ये कार्यरत होतील, तरी महाराष्ट्रातील सैनिक शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याच्या दिनांक १७ सप्टेंबर, २००३ च्या शासन निर्णयानुसार धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये राज्यातील सर्वसाधारण खाजगी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा व तुकड्या व त्यावरील शिक्षक/शिक्षकेतर पदांना टप्पा अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयामध्ये सैनिकी शाळांचा समावेश नाही.

राज्यातील ४ सैनिकी शाळांतील मूळ तुकड्या १०० टक्के अनुदानावर असून अतिरिक्त तुकड्यांना वाढीव टप्पा देण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १६/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सैनिकी शाळांमध्ये प्रवेशित होणाऱ्या अनुसूचित जमातीच्या निवासी विद्यार्थ्यांना दरडोई परिपोषण अनुदान (निर्वाह भत्ता) रुपये २२००/- दरमाह दरडोई अनुज्ञेय आहे.

सैनिकी शाळांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत शासनाकडे कोणताही पत्रव्यवहार प्राप्त झाल्याचे आढळुन आलेले नाही.
(३) व (४) दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्वसाधारण खाजगी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा व तुकड्या व त्यावरील शिक्षक/शिक्षकेतर पदांना टप्पा अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

सैनिकी शाळांबाबत स्वतंत्र धोरण असल्यामुळे राज्यातील ४ सैनिकी शाळांतील मूळ तुकड्या १०० टक्के अनुदानावर असून अतिरिक्त तुकड्यांना वाढीव टप्पा देण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १६/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या निवासी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता अनुज्ञेय आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आनंदसाई अर्बन को-ऑप क्रेडिट सोसा. लि. नागपूर पतसंस्थेच्या २५ माजी संचालकांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(५) *५७५८ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंदसाई अर्बन क्रेडीट को-ऑपरेटिव्ह सो.लि. पतसंस्थेच्या २५ माजी संचालकांनी गैरव्यवहार, अनियमितता व अपहार केल्याप्रकरणीचा अहवाल सहकार आयुक्त, पुणे यांना प्राप्त झाला असल्याने सहकार आयुक्तांनी दिनांक २९ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये सदरहू रक्कम माजी संचालकांकडून वसूल करण्याचे जिल्हा पतसंस्था सहकारी संघ (फेडरेशन) नागपूर यांना आदेशित करूनही अद्याप वसूली झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अपहार रकमेची तात्काळ वसूली करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री महोदयांना दिनांक ५ ऑगस्ट, २०२५ रोजी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आनंदसाई अर्बन क्रेडीट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड पतसंस्थेच्या संबंधित दोषी २५ माजी संचालकांवर कोणती कारवाई केली तसेच सदर गैरव्यवहार केलेल्या रकमेची वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) आनंदसाई अर्बन को-ऑप क्रेडिट सोसा. लि. नागपूर (अवसायनात) या संस्थेच्या एकूण २५ अपचारी यांचेविरूध्द सहकार आयुक्त कार्यालय, पुणे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८ (ब) अन्वये दिनांक ०३/०४/२०२४ रोजी रुपये १०,७३,०४,९६९/- चे वसुली प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. सदर रकमेची वसूली करण्याकरिता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेमार्फत विशेष वसूली व विक्री अधिकारी, नागपूर जिल्हा पतसंस्था व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ मर्या. नागपूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित अपचारी यांचेकडून वसूलीबाबत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरविणाऱ्या संस्थांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(६) * ४९९० श्री.शशिकांत शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.संजय खोडके, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र शासनाच्या नियमानुसार शाळांतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यापूर्वी शिक्षकांनी अन्नाचा दर्जा तपासणे व चव चाखणे तसेच त्यांची नोंदही ठेवणे आवश्यक असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजन योजनेकरिता २० संस्थांकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे कंत्राट देऊन ३६४ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करुन शासनाची फसवणूक केल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांमध्ये मुलांना पुरविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनातील विषबाधा रोखण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना देऊनही या सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली नाही, तसेच मा.न्यायालयाच्या निदेशानुसार शाळांतील अन्नाच्या तपासणीसाठी फुड इन्स्पेक्टरची नियुक्ती करण्याचे आदेश देऊनही त्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, तथापि, अन्न व औषध प्रशासनामार्फत त्याबाबतचे नमुने घेण्यात आले असून त्यांची तपासणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजन योजनेकरीता २० संस्थाकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे कंत्राट देऊन ३६४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच मध्यान्ह भोजन योजनेची अंमलबजावणीमध्ये येत असलेल्या अडचणी दूर करुन सदर योजनेची अंमलबजावणी सुरळीतपणे करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकांतर्गत येणाऱ्या शाळांमध्ये केंद्र शासनाच्या नियमानुसार शाळांतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यापूर्वी शिक्षक अन्नाचा दर्जा व चव चाखून त्यांची नोंद नोंदवहीमध्ये नियमितपणे ठेवली जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिकांतर्गत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पात्र शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिजविलेल्या अन्नाचे वितरण करण्याकरीता स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रिया दिनांक १३ ऑगस्ट, २०२४ रोजी पूर्ण करण्यात आली. त्यानुसार १४७ पात्र संस्थांची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या संस्थांबाबत विविध तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सदर तक्रारींची पडताळणी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली असून सदर चौकशी समितीच्या अहवालानूसार खोटी कागदपत्रे सादर केलेल्या व प्रक्रियेदरम्यान काळ्या यादीत नाव असलेल्या एकूण ४ संस्थांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.
(२) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विषबाधेच्या घटना घडू नयेत यासाठी पालन करावयाच्या मानक कार्यपध्दती (SOP - Standard Operating Procedure) दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्या आहेत. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत अन्न सुरक्षा अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शाळांतील अन्न पदार्थांचे नमुने आवश्यकतेनुसार विश्लेषणासाठी घेत असतात. अन्न व औषध प्रशासनाद्वारे बृहन्मुंबई विभागात सन २०२३-२४ या कालावधीत मध्यान्ह भोजन योजनेतील अन्नपदार्थांचे ५ नमुने विश्लेषणसाठी घेण्यात आले होते व त्यापैकी ४ अन्न नमुन्याचे विश्लेषण अहवाल प्रमाणित झाले असून १ अन्न नमूना कमी दर्जाचा घोषित झाला आहे.
(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशी समितीच्या अहवालानुसार खोटी कागदपत्रे सादर केलेल्या व प्रक्रीयेदरम्यान काळ्या यादीत नाव असलेल्या एकूण ४ संस्थांची नियुक्ती तात्काळ रद्द करून दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ पासून त्यांच्या जागी प्रतिक्षा यादीतील संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर उर्वरित पात्र संस्थांच्या कागदपत्राच्या पडताळणीअंती कार्यरत असणाऱ्या संस्थांपैकी अन्य ६ संस्था व प्रतिक्षा यादीतील २ संस्था अपात्र ठरत

असल्यामुळे त्यांच्यावर नियमोचित कारवाई सुरु आहे. तसेच, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकांच्या शाळांमधील मूलांना पुरविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनाच्या नमुन्याची चाचणी Shree ATR Laboratory Services (OPC) Private Ltd. यांच्याद्वारे नियमीत तपासणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांकडे अशैक्षणिक कामे सोपविण्यात येत असल्याबाबत

**(७) * ५०८२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षकांनी अध्यापन करणे हे विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे काम असतानाही विधानसभा, लोकसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका जाहीर झाल्यानंतर शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून काम दिले जाते, तसेच खाजगी अनुदानित, विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांच्या सेवा निवडणूकपूर्व कार्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय अधिग्रहित करित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शाळांमध्ये एकाच शिक्षकांकडे दोन-तीन वर्गांची जबाबदारी असतानाही शिक्षकांवर अनेक अशैक्षणिक कामे सोपविली जात असल्याने दैनंदिन अध्यापनाच्या कामावर नकारात्मक परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद व अन्य निवडणुका जाहीर झालेल्या असल्याने प्रत्यक्ष निवडणूक कार्याशी संबंधित नसलेली मतदार नोंदणीसारखी महसूली कामेही शिक्षकांवर सोपविण्यात आली असल्याने या कामांना शिक्षकांकडून विरोध होत असून, प्रत्यक्ष निवडणूक कार्याकरीता शिक्षकांच्या सेवा घेता येण्याची आरटीईमधील तरतूद असताना निवडणूकपूर्व कामाकरिता शिक्षकांच्या सेवा घेतल्यामुळे आरटीई या कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन होत आहे, तसेच सदर निवडणुकांकरीता शाळांमधील सर्व शिक्षकांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील निवडणुकीबाबतच्या बैठकीकरीता शिक्षक हजर न राहिल्यास व ज्या मुख्याध्यापकांनी शिक्षकांना निवडणूक कार्याकरिता कार्यमुक्त केले नाही, त्यांच्याविरुध्द जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कारवाई केली जाते तसेच शासनाची माहिती भरण्याची अनेक कामेही सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिक्षकांच्या अध्यापन कार्यात खंड पडू नये आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे यादृष्टीने शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित न करणेबाबत तसेच शिक्षकांना अशैक्षणिक (बीएलओ) कामांतून तात्काळ मुक्त करण्याबाबत व ज्या मुख्याध्यापकांनी शिक्षकांना निवडणूक कार्याकरता कार्यमुक्त केले नाही, त्यांच्याविरुध्द जिल्हाधिकारी कार्यालयाकडून होत असलेली कारवाई थांबविण्याबाबत तसेच शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच शिक्षकांना मतदान

केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून कायमस्वरूपी कार्यमुक्त करण्याकरीता शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत : खरे आहे.

काही शिक्षकांच्या सेवा निवडणूकपूर्व कामाकरिता जिल्हाधिकारी कार्यालये अधिग्रहित करीत असल्याचे निदर्शनास येते.
(३), (४) व (५) शिक्षकांची अशैक्षणिक या कामातून सुटका व्हावी व त्यांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून या शासन निर्णय दिनांक २३/०८/२०२४ अन्वये शैक्षणिक कामे, अशैक्षणिक कामे व आरटीई ॲक्टनुसार करावयाची अनिवार्य कामे याबाबतचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे व स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधीमंडळ व संसद यासाठी होणाऱ्या निवडणूकांची कामे ही शैक्षणिक कामांव्यतिरिक्त येणारी कामे शिक्षकांनी करणे अनिवार्य राहील, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच दिनांक २३/०८/२०२४ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमूद करण्यात आलेली अशैक्षणिक कामे शिक्षकांना न देण्याबाबत आवश्यक त्या सूचना संबंधित विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांना द्याव्यात, यासाठी त्या-त्या विभागांच्या प्रमुखांना मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावरुन कळविण्याबाबतची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांच्या तूर व उडीद डाळीस हमीभाव मिळत नसल्याबाबत

**(८) * ५६५७ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने कापसाचे ११ टक्के आयातशुल्क माफ केल्यानंतर आता तूर आणि उडीद डाळीवरही शुल्क मुक्त आयातीला परवानगी दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयातशुल्क सवलत दिल्यामुळे अत्यंत स्वस्त व मोठ्या प्रमाणात डाळींची आयात वाढल्यामुळे बाजारातील डाळीचे दर कमी झाले असूनही तूर व उडीद डाळी उत्पादकांना मात्र हमीदर मिळत नाही तसेच स्थानिक कापसालाही सदर हंगामात हमीदर मिळणार नसल्याचे दिनांक १९ सप्टेंबर,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत तुरीला रुपये ८,००० हमीदर असताना बाजारात मात्र रुपये ६,००० ते ६,२०० दर असून उडीदाचा हमीदर रुपये ७,८०० असूनही बाजारात मात्र उडीदास रुपये ७,५०० पर्यंत भाव असल्याचे आणि कापसाचे अद्याप आगमन झाले नसले तरी गतवर्षाप्रमाणेच रुपये ७,००० च्या जवळपास दर राहण्याची शक्यता खरेदीदारांनी वर्तविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक ३१/१२/२०२५ पर्यंत कापसावरील ११ टक्के आयात शुल्क माफ केले आहे.

(२) हे खरे नाही.

आयात निर्यात विषयक बाबी या केंद्र शासनाशी संबंधित आहे. त्यामुळे त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय केंद्र शासनामार्फत घेण्यात येतो.

(३) हे खरे नाही.

(४) हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत योजनेंतर्गत सोयाबीन, उडीद, मूग व कापूस हमीभाव खरेदी सुरू करण्यात आली आहे. किमान आधारभूत योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यासाठी जाहिराती, शेतकऱ्यांच्या नोंदणीकरीता प्रसिध्दी माध्यमांद्वारे, दवंडी पिटवून, गावोगावी माहिती मिळण्यासाठी प्रसिध्दी पत्रके, फलके तसेच सोशल मिडीयासारख्या विविध माध्यमांद्वारे माहिती पोहचविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रात्रशाळा पटसंख्येअभावी बंद होत असल्याबाबत

**(९) * ४९८२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.संजय खोडके, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिसरातील कष्टकरी, कामगार व शिक्षणापासून वंचित राहिलेल्या तरुणांना शिक्षणाची संधी देणाऱ्या एकूण १३८ रात्रशाळांपैकी गत चार वर्षांत केवळ १२० रात्रशाळा कार्यरत असून, एकूण १७ रात्रशाळा बंद झाल्या आहेत, यास मराठी माणसांचे मुंबईबाहेर होत असलेले स्थलांतरण कारणीभूत असून त्यामुळे रात्रशाळांमधील पटसंख्या मोठ्या प्रमाणात घटली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रात्रशाळांमध्ये कार्यरत शिक्षकांपैकी काहींची इतर शाळांमध्ये दिवसा नोकरी असताना, रात्रशाळांवर दुबार नियुक्ती दिली जात असल्याबाबत शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतला असून, पात्र बेरोजगार शिक्षकांना प्राधान्य द्यावे अशी मागणी केली आहे, तसेच दुसऱ्या शिक्षक संघटनेने अनुभवी शिक्षकांना पुन्हा नियुक्ती द्यावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "युडायस (UDISE)" पोर्टलवर रात्रशाळांतील १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांची नोंद व तपासणी पूर्ण करण्यात आलेली नाही, तसेच रात्रशाळांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, हॉटेल इंडस्ट्रीज इत्यादी कौशल्य विकास अभ्यासक्रम अद्याप सुरू करण्यात आलेले नसल्यामुळे या विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याचेही त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत माहिती घेवून सदर रात्रशाळांसाठी आवश्यक असलेल्या सुधारणा आणि कमतरता दूर करुन उक्त रात्रशाळा कार्यरत राहण्यासाठी निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीबाबत तातडीने उपाययोजना करण्यासाठी रात्रशाळा मुख्याध्यापक संघटनेच्या पदाधिकारी यांनी शासनाकडे वारंवार लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील रात्रशाळा सुस्थितीत कार्यरत राहण्याच्या दृष्टीने रात्रशाळांचे अस्तित्व टिकविणे, शिक्षकांची वेळेवर नियुक्ती, कौशल्याधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, रात्रशाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी व रात्रशाळांचे घटणारे प्रमाण, तसेच १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांची तपासणी व आर्टिफिशयल इंटेलिजल्स वा अन्य नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अलिकडील काळात काही रात्र शाळा बंद झाल्या आहेत ही वस्तुस्थिती असली तरी मुंबई बाहेरील स्थलांतराशी त्याची सांगड घालता येणार नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) "युडायस (UDISE)" पोर्टलवर रात्रशाळांतील १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांची आधार कार्ड तपासून त्याची नोंद घेण्याची मुभा रात्र शाळांना देण्यात आली होती. रात्र शाळांमध्ये औपचारीक शिक्षण दिले जात असून कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम व आर्टिफिशयल इंटेजिलन्स वा अन्य नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे विचारणा करुन निर्णय घेण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील २६१ सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या योजनांचे थकीत कर्ज माफ करण्याबाबत

**(१०) * ५४६९ श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आर्थिक अडचणीत असणाऱ्या २६१ सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या योजनांचे थकीत कर्ज मुद्दल अंदाजित रक्कम रुपये १३२.५४ कोटी माफ करून, उक्त रक्कम संबंधित बँकांना शासनामार्फत अदा करण्यास दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली, मात्र अद्यापपर्यंत उक्त पाणीपुरवठा संस्थांची कर्जे माफ करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेऊनही शासन निर्णय न काढल्याने बँकांनी सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या योजनांकडे कर्ज वसुलीसाठी तगादा लावला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २६१ सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या योजनांचे थकीत कर्ज मुद्दल अंदाजित रक्कम रुपये १३२.५४ कोटी माफ करण्याबाबत तात्काळ शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय. हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

यासंदर्भात शासनाच्या दिनांक १६/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील उपसा जल सिंचन संस्थांच्या थकित कर्जाच्या जप्तीची कार्यवाही तूर्तास करु नये असे सबंधित बँकांना कळविण्यात आले आहे.
(३) व (४) भारतीय रिझर्व्ह बँकेंच्या दिनांक ३१/१२/२०२४ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात कर्जमाफी योजना राबवावयाची झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी राज्य शासनाने घ्यावयाची आहे. याबाबत वित्तीय संस्थांना कोणताही आर्थिक भार दयायचा नाही असे निर्देश आहेत.

सदर निर्देशांस अनुसरून सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या योजनांचे थकीत कर्ज व्याजासहित माफ करावे लागणार आहे.

सदरची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## बेवारटोला (ता.साकोली, जि.गोंदिया) धरण प्रकल्पांतर्गत कालव्यांची कामे अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(११) * ५११९ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेवारटोला धरण (ता.साकोली, जि.गोंदिया) प्रकल्पाचे काम सन २००२ साली पूर्ण झाले असून, या प्रकल्पाचे पाणी माहे जुलै, २०२५ मध्येही शेतीसाठी वितरित झालेले नसल्याने या प्रकल्पांतर्गत पाच हजार एकर सिंचनक्षेत्र तयार करण्यात आले असूनही अद्याप कालव्यांची कामे अपुर्णावस्थेत असल्याने शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्जुनी मोरगाव, गोंदिया, साकोली, लांजी, सालेकसा आदी तालुक्यांतील हजारो शेतकरी दरवर्षी या प्रकल्पाच्या पाण्यावर अवलंबून असून, पाणी न मिळाल्यामुळे त्यांना अल्प उत्पादन, पीकपध्दतीतील बदल व कर्जबाजारीपणाला सामोरे जावे लागत आहे, तसेच कालव्यांसाठी आवश्यक वितरिका अद्याप तयार न झाल्यामुळे पाणी वितरणाची यंत्रणा कार्यान्वित होऊ शकली नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणासाठी शासनाने ९०.०७ कोटी रुपयांचा खर्च केला असूनही केवळ नियोजनाच्या अभावामुळे व यंत्रणांच्या उदासीनतेमुळे आणि ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे हे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच यंत्रणांच्या उदासीनतेमुळे आणि ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे सदर प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच पाणी वितरण कार्य तात्काळ सुरू करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

बेवारटोला लघु प्रकल्पाची घळ भरणी सन २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे. प्रकल्पाची प्रकल्पिय सिंचन क्षमता १३१० हे. असून त्यापैकी ९९५ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. उर्वरित ३१५ हे. सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी डाव्या कालव्यावरील टोयागोंदी, चांदसुरज व कोपालगड कालव्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कालव्यांची कामे माहे जून, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्पामुळे सिंचनाचा लाभ गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यामधील ०८ गावांना मिळत आहे.

(३) हे खरे नाही.

प्रकल्पाला सन २०१८ साली रुपये ८९.६५ कोटी करीता तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रकल्पिय सिंचन क्षमतेपैकी ७६% सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धाराशीव जिल्ह्यातील पाच शाळांतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या ‘मिलेट न्यूट्रेटिव्ह बार’मध्ये अळया सापडल्याबाबत

**(१२)** * **४७७३ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या पूरक पोषण आहारातील ‘मिलेट न्यूट्रेटिव्ह बार’ (चॉकलेट) मध्ये जिवंत अळया आढळल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाच शाळांमध्ये धाराशिव तालुक्यातील पिंपरी येथील शाळा, उमरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री छत्रपती विद्यालय, तुरोरी येथील ज्ञानेश्वर विद्यालय तसेच येळी येथील शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उक्त प्रकरणी संबंधित शाळांना भेट देऊन तपासणी करून शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालानुसार धाराशिव जिल्ह्यातील पाच शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पोषण आहार पुरविणाऱ्या पुरवठादार एजन्सीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

परंतु सदर बाब माहे जुलै, २०२५ मध्ये आढळून आली आहे.

(३) व (४) विद्यार्थी आरोग्याच्या हितासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव यांनी संपूर्ण धाराशिव जिल्ह्यामध्ये मिलेट न्युट्रिटिव्ह बार शाळास्तरावर स्विकारणे व विद्यार्थ्यांना वाटप करणे दिनांक

०९ जुलै, २०२५ पासून थांबविले आहे. तसेच, याबाबत शासनाने दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये - धाराशिव जिल्ह्यामध्ये शाळास्तरावर सद्य:स्थितीत साठा असलेले मिलेट न्युट्रिटिव्ह बारचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येवू नये. तसेच, शाळास्तरावर वितरीत करण्यात आलेल्या मिलेट बारचे नमुने अन्न व औषध प्रशासन व एनएबीएल प्रमाणित प्रयोगशाळेकडून तपासून घेण्याचे, वाटप न होणाऱ्या मिलेट बारचे देयके अदा करण्यात येवू नये. तसेच, धाराशिव जिल्ह्यामध्ये मिलेट बारचा निकृष्ट दर्जाचा पुरवठा केल्याबद्दल आणि मिलेट बारचा पुरवठा विहित कालमर्यादेत केला नसल्यामुळे संबंधित संस्थेवर करारनाम्यातील तरतूदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी शाळांतील रिक्त पदे मानधन तत्वावर भरणेबाबत

**(१३) * ५३१८ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पालघर, रत्नागिरी, गडचिरोली व इतर आदिवासी जिल्ह्यांतील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता निर्माण झाल्यामुळे शासनाने मानधन तत्वावर शिक्षक भरती करण्यास परवानगी दिलेली असून, सन २०१२ पासून अनुदानित शाळांमध्ये नियमित शिक्षक भरती झालेली नसल्यामुळे तसेच सन २०१७ पासून लागू झालेल्या 'पवित्र' प्रणाली अंतर्गत अद्ययावत रोस्टर तपासणी आवश्यक आहे, परंतु अनुसूचित जमातीच्या क्षेत्रातील जिल्ह्यांसाठी रोस्टर तपासणी बंद असल्याने व मागील १३ वर्षांमध्ये शिक्षक मोठ्या प्रमाणात सेवानिवृत्त झाल्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक वर्गाची मोठी कमतरता निर्माण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय आहे,
(२) असल्यास, खाजगी शैक्षणिक संस्थांना मानधन तत्वावर शिक्षक भरतीसाठी परवानगी दिलेली नसल्याने शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी काही खाजगी अनुदानित संस्थांनी आपल्या शाळांमध्ये तात्पुरत्या मानधनावर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानधन तत्वावरील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मागील सुमारे १३ वर्षे तुटपुंज्या मानधनावर ज्ञानदानाचे कार्य प्रामाणिकपणे केले आहे, अशा कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण व शासन मान्यता देण्याबाबत तसेच शासनाने पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषदांना सर्व संवर्गातील शिक्षक भरती मानधन तत्वावर करण्यास तात्पुरती मान्यता दिली आहे, त्याचप्रमाणे खाजगी शैक्षणिक संस्थांनाही अशा प्रकारे मानधन तत्वावर शिक्षक भरती करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) अनुसूचित जमातीच्या पेसा क्षेत्रातील रिक्त शिक्षकांच्या पदाकरीता अर्हता प्राप्त उमेदवार तुलनेने कमी उपलब्ध होतात. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार १५४४ उमेदवार पात्र ठरले आहेत. तथापि, पेसा क्षेत्रातील आरक्षणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२२१०९/२०२३ दाखल असल्याने, पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदभरतीच्या

कार्यवाहीस सामान्य प्रशासन विभागाने स्थगिती दिली होती. जिल्हा परिषदांच्या शाळांत रिक्त पदांची संख्या अधिक असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार पात्र १५४४ उमेदवार, अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र, तसेच सेवानिवृत्त शिक्षक यांना दिनांक १५/०७/२०२४ च्या शासन पत्रान्वये तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर शिक्षक पदी नेमण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. राज्यातील एसईबीसी आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये १० टक्के आरक्षण लागू करण्यात आल्याने याबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७/०२/२०२४ च्या शासन निर्णयामध्ये पेसा क्षेत्रातील बिंदुनामावली अद्ययावत करणेबाबत स्पष्ट निकष नसल्यामुळे सुधारित आरक्षणासह बिंदुनामावली अद्ययावत करण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २९/०७/२०२५ च्या शासन निर्णयान्वये आठ आदिवासी बहुल जिल्ह्यांसाठी सुधारित आरक्षण व बिंदुनामावली निश्चित केली आहे. त्यानुसार आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ नुसार पुढील पदभरतीसाठी बिंदूनामावली अद्यावत करणेबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. रिट याचिका क्र.२२१०९/२०२३ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०६/१०/२०२५ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशानुसार पेसा क्षेत्रातील आरक्षित प्रवर्गाची ५० टक्के पदे भरण्यास परवानगी दिली आहे. या आधारावर सामान्य प्रशासन विभागाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्यानंतर जिल्हा परिषदांच्या शाळांसह खाजगी शाळांना या मर्यादेत पदभरती करता येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कंत्राटी शिक्षकांची संख्या वाढत असल्याबाबत

**(१४) * ५१५१ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कंत्राटी शिक्षकांची संख्या वाढत असून राज्यात एकूण ७५,४७० कंत्राटी शिक्षक कार्यरत असून, पुणे जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच ८,९६९ कंत्राटी शिक्षक कार्यरत असल्याचे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या माहे ऑगस्ट, २०२५ च्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिषदेच्या अहवालानुसार ठाण्यात ६,९१२, नाशिकमध्ये ४,५६८, नागपूरमध्ये ४,५३३ आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये ३,३८१ शिक्षक कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असून, कंत्राटी शिक्षकांमध्ये अर्धवेळ आणि पूर्णवेळ असे दोन प्रकार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी शिक्षकांना कायम करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे व त्यानुसार सदर कंत्राटी शिक्षकांना कायम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

युडाईस प्लस पोर्टल वरील माहितीनुसार सन २०२४-२५ मध्ये राज्यात ७५७४० शिक्षक कंत्राटी तत्वावर कार्यरत असून त्यापैकी जवळपास ८० टक्के शिक्षक हे स्वयंअर्थसहाय्यित शाळा व विनाअनुदानित शाळांवर कार्यरत आहेत.

केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पेसा क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी देखील सेवानिवृत्त शिक्षक व अन्य पात्र उमेदवार यामधून कंत्राटी तत्वावर नियुक्तीस शासनाची मान्यता आहे.

(३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांकरीता कंत्राटी शिक्षक नेमण्यास देण्यात आलेली मान्यता म्हणजे विद्यार्थ्यांचे हित विचारात घेऊन नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत करण्यात आलेली तात्पुरती व्यवस्था आहे. या शिक्षकांना कायम करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसल्याने आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(१५)** * **५२७४ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने पिवळा वाटाणा, तूर आणि उडदाच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिली असल्याने व हरभरा, मसूरच्या आयातीवर केवळ दहा टक्के आयात शुल्क लागू केले असल्यामुळे राज्यातील कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावाइतकाही दर मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने ग्राहक हितासाठी पिवळा वाटाणा, तूर आणि उडदाच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्याने राज्यातील कडधान्य उत्पादन शेतकऱ्यांना हमीभावा इतका दर देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात सोयाबीन, उडिद व मूग खरेदीसाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून नोंदणी व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून खरेदी प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. हंगाम २०२५-२६ मधील तूर खरेदीसाठी सुरू करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. किमान आधारभूत योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यासाठी जाहिराती, शेतकऱ्यांच्या नोंदणीकरीता प्रसिध्दी माध्यमांद्वारे, दवंडी पिटवून, गावोगावी माहिती मिळण्यासाठी प्रसिध्दी पत्रके, फलके तसेच सोशल मिडीयासारख्या विविध माध्यमांद्वारे माहिती पोहचविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातील ग्रंथालयाच्या दुरुस्तीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१६)** * **५३५१ ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील मराठी विभागातील ग्रंथालयाच्या गेल्या वर्षभरापासून अपूर्णावस्थेत असल्याने बहुमुल्य ग्रंथसंपदा धुळखात पडून असल्याचे तसेच विद्यार्थ्यांना ग्रंथालयात बसून भाषेचा अभ्यास आणि संशोधन करता येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रंथालयाच्या दुरुस्तीचे काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रंथालयाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

मराठी विभागाचे ग्रंथालय रानडे भवन इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर स्थापित आहे. पावसाळ्यामध्ये पाणी गळती झाल्याने स्लॅब व भिंतींचे दुरुस्ती काम व विद्युत संबंधित काम पूर्ण करण्यात आले. या कालावधीत इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील मराठी विभागाच्या संशोधन कक्षात विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची पुस्तके वापरण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली होती. विद्यार्थ्यांना ग्रंथालयात बसून भाषेचा अभ्यास आणि संशोधन याबाबत कोणतीही गैरसोय झालेली नाही.

(२) लागू नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) येथील निम्न वर्धा प्रकल्पाच्या उपसा सिंचन योजनेची कामे अपुर्णावस्थेत असूनही योजनेचे ई-लोकार्पण झाल्याबाबत

**(१७) * ५३८३ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील धनोडी येथे निम्न वर्धा प्रकल्पावर मंजूर असलेल्या उपसा सिंचन योजनेचे काम अपूर्ण असूनही ते पूर्ण झाल्याचे दाखवून दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते ई- लोकार्पण करण्यात आले, यासंदर्भात मे. जैन इरिगेशन सिस्टीम जळगाव या कंपनीवर व संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतचे निवेदन मा.जलसंपदा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी उपसा सिंचन योजनेचे काम सन २०१८-१९ मध्ये मे. जैन इरिगेशन सिस्टीम जळगाव यांना दिनांक २० जून २०१८ ला देण्यात आल्यापासून करारनाम्यानुसार हे काम दिनांक १९ जून, २०२० पर्यंत पूर्ण करणे आवश्यक असताना केवळ ४५% काम पूर्ण झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेखाली ८४०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे प्रस्तावित असून, प्रत्यक्षात त्यापैकी निम्मे कामही पूर्ण झालेले नसतानाही मोठ्या प्रमाणात देयकांची उचल करण्यात आली आहे, कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरू असलेल्या सदर गैरव्यवहाराची चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक १३/१०/२०२५ रोजीचे निवेदन मा.मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), जलसंपदा यांच्या कार्यालयात प्राप्त आहे.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते योजनेचे टप्पा-१ (२२८८ हे. क्षेत्राचे) दिनांक १३/०४/२०२५ रोजी ई- लोकार्पण करण्यात आले.

(२) नाही, हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर योजनेची ७० टक्के भौतिक कामे पूर्ण झाली आहेत.

यामध्ये सर्व ८४०० हेक्टर लाभक्षेत्राची विभागणी सुमारे १८ हेक्टरपर्यंतच्या विविध भागांमध्ये (chaks) करण्यात आली असून त्यासाठीच्या वितरणप्रणालीचे काम पूर्ण झाले आहे. लाभक्षेत्र विकासाची कामे प्रगतीपथावर असून ब्लॉक २ धनोडी मधील २२८८ हेक्टर व ब्लॉक-३ रोहणा मधील ७५० हेक्टरची कामे पूर्ण झालेली आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रस्तुत कामावर आतापर्यंत १०७.१८ कोटी खर्च झालेला असून, प्रत्यक्ष सिंचनाकरीता ब्लॉक २ धनोडी मधील ७३३ हेक्टर क्षेत्रात चालू हंगामात प्रवाही पाणी चाचणी घेवून प्रत्यक्ष सिंचन सुरु आहे.

सदर कार्यक्षेत्रावर मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता तसेच जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडून वेळोवेळी कामाचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच योजना नियोजित वेळेत पूर्ण करणेकरीता कंत्राटदारास वारंवार निर्देश दिलेले आहेत.

कंत्राटदारास प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या प्रगतीनुसार वेळोवेळी बिलाचे भुगतान करण्यात आलेले आहे.

करारनाम्याप्रमाणे विहित वेळेत कामे पूर्ण न झाल्यामुळे व कामाची गती संथ असल्यामुळे मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, ज.सं. विभाग नागपूर यांनी कंत्राटदाराकडून रुपये १,००,०००/- प्रति दिवस प्रमाणे दंडनीय आकारणी सुरू केली आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत डाव्या आणि उजव्या कालव्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१८) * ५८५३ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील ऊर्ध्व प्रकल्पाच्या डाव्या आणि उजव्या या दोन्ही कालव्यांना माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जवळपास साठ ठिकाणी भिंतीस तडे पडून सदर कालव्याची दुरवस्था झाली असल्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालव्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून संबंधित ठेकेदार व संबंधित अधिकारी यांची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी तसेच कालव्याचे काम पुन्हा दर्जेदार करुन देण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून संबंधित विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर कालव्याचे काम दर्जेदार करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर डाव्या व उजव्या कालव्याची तसेच शाखा कालव्याची मूळ कामे १९८२ ते १९८४ मध्ये पूर्ण झाली असून सदर कालव्याद्वारे गेल्या ३७ वर्षांपासून सिंचन सुरू आहे. सद्यःस्थितीत कालव्याचे भरावकाम, अस्तरीकरण, व बांधकामे क्षतीग्रस्त झालेली असल्याने सिंचन व्यवस्थापनात अडचणी निर्माण होत आहेत. तसेच प्रकल्पांतर्गत इसापूर उजवा कालवा व डावा कालव्यावरील वितरण व्यवस्थेची (उपवितरिका व लघुवितरीका) जवळपास एकूण १३७५ कि.मी. लांबीत अस्तरीकरणाची निविदा कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०२५ मध्ये ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात सर्वत्र झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर सुरु असलेल्या अस्तरीकरणाच्या कामामध्ये काही ठिकाणी कालव्याच्या अस्तरीकरणास तडे गेल्याचे दिसून आले आहेत.
(२) हे खरे नाही.

उजव्या व डाव्या मुख्य कालव्यावरच्या कामासंदर्भात सदर प्रश्नात नमूद केल्यानूसार शेतकऱ्यांची तक्रार किंवा मागणी प्राप्त नाही. सद्यःस्थितीत प्रगतीपथावर असलेली कामे निविदा अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराकडून तांत्रिकदृष्ट्या योग्यरितीने करुन घेण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात कांदा खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(१९)** * **४७०० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात केंद्र शासनाच्या किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेड, एनसीसीएफकडून सुरू असलेल्या कांदा खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांकडून १० ते १५% कांदा कमी (कापत) दरात खरेदी करणे, तसेच खरेदीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण न करणे अशी अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांदा खरेदीत होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी शासनाने दिनांक १८ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून दक्षता समित्या नेमल्या आहेत, मात्र सदर दक्षता समित्यांनी शासनाला वेळेत अहवाल सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून दिनांक १२ जून २०२५ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील कांदा धोरण ठरविण्यासाठी व विविध उपाययोजनांचा विचार करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली असून, या समितीस तीन महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कांदा खरेदीत होणाऱ्या गैरव्यवहाराबाबत शासनाने नाशिक जिल्ह्यासह इतर ठिकाणी नेमलेल्या दक्षता चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, तसेच दिनांक १२ जून, २०२५ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार कांदा धोरण ठरविण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्राप्त झालेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कांदा खरेदीत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच कांदा धोरण ठरविण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने सुचविण्यात आलेल्या शिफारशी व शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रस्तावित उपाययोजनांचा विचार करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
शासन निर्णय दिनांक १८ जुलै, २०२५ अन्वये दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. नियुक्त करण्यात आलेल्या दक्षता समितीने कांदा खरेदी केंद्राचा तपासणी अहवाल दर आठवड्याला जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर केलेला आहे.
(३) होय.
(४) हे अंशत: खरे आहे.
शासन निर्णय दिनांक १८ जुलै, २०२५ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या दक्षता समितीने कांदा खरेदी केंद्राचा तपासणी अहवाल दर आठवड्याला जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर केलेला आहे.
शासन निर्णय दिनांक १२ जून, २०२५ अन्वये गठित समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.
(५) दक्षता समितीने नाशिक जिल्ह्यातील नाफेड व एनसीसीएफ यांच्यामार्फत कांदा खरेदीसाठी सुरू करण्यात आलेल्या एकूण ४८ खरेदी केंद्रांची खरेदी प्रक्रीयेदरम्यान तपासणी केली आहे. त्यानुषंगाने पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १०० टक्के अनुदानित शाळांमधील शिक्षकांसाठी लागू असलेल्या शिक्षण सेवक योजना रद्द करून मानधन वाढविणेबाबत

**(२०) * ५५४२ श्री.किरण सरनाईक, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील शंभर टक्के अनुदानित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये नियुक्त होणाऱ्या शिक्षकांसाठी सन २००० पासून शिक्षण सेवक योजना सुरू करण्यात आली असून सदर शिक्षण सेवक योजनेतील अन्यायकारक तरतुदी रद्द करणे, मानधन वाढविणे, स्थायीकरणाचा कालावधी कमी

करणे तसेच शिक्षकांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लाभ देण्याबाबत शिक्षण संघटनांकडून अनेकवेळा मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवित्र प्रणाली टप्पा एक व टप्पा दोन अंतर्गत नियुक्त शिक्षक/कर्मचारी यांपैकी अनेकांनी सेवेत नियुक्त होण्यापूर्वी इतर आस्थापनांवर परिविक्षाधीन कालावधीत कार्य केलेले असूनही, १०० टक्के अनुदानित शाळांवर नियुक्त कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीतील शिक्षकांप्रमाणेच काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याची आर्थिक परिस्थिती समाधानकारक असल्याने शिक्षण सेवक योजना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) शिक्षण सेवक योजनेंतर्गत निवड झालेल्या शिक्षकास ठोक मानधनावर ३ वर्षांकरीता नियुक्ती देण्यात येते. या कालावधीत त्याने पार पाडलेल्या कामगिरीचे यथोचित मुल्यमापन करुन त्यास सेवेत नियमित करण्यात येते. एका प्रकारे हा शिक्षक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी आहे. शिक्षण सेवक योजनेमुळे उमेदवारांच्या शिक्षक पदावरील नियमित नियुक्तीस बाधा पोहोचत नाही. शिवाय शिक्षण सेवक पदावरील सेवा वरीष्ठ वेतनश्रेणीकरीता व सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात येत असल्याने एकूण अर्हताकारी सेवेच्या कालावधीवर त्याचा विपरीत परिणाम होत नाही. तसेच शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०२३ अन्वये या मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना अनुक्रमे रुपये १६,०००/-, रुपये १८,०००/- व रुपये २०,०००/- इतके ठोक मानधन अदा केले जाते. या सर्व बाबी तसेच संभाव्य वित्तीय भार विचारात घेता, शिक्षण सेवक योजना रद्द करणे संयुक्तिक होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील शाळांमधील सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२१) * ४८८५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४० प्राथमिक शाळेत सन २०२४-२५ मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून शालेय परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमरे बसविण्यासाठी रुपये २.४० कोटींचा निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मंजूर करण्यात आला असून, सदर निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात सर्व शाळांमध्ये निविदेत ठरल्याप्रमाणे दर्जेदार सी.सी.टी.व्ही. कॅमरे व इतर साहित्य बसविण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निविदेत ठरल्याप्रमाणे दर्जेदार सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत व सदर साहित्य खरेदीत केलेली अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०२४-२५ मध्ये गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी GEM पोर्टलवर निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. यातून निविदाधारकाची निवड करुन सर्व २४० शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व इतर साहित्य बसविण्यात आले आहेत. सदर निविदा प्रक्रियेत कोणतेही गैरप्रकार व अनियमितता आढळून आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी राजापूर अर्बन बँकेकडून कर्ज न घेतलेल्या खातेदारांना कर्ज परताव्याच्या नोटीस पाठविल्याबाबत

**(२२) * ५६८२ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी राजापूर अर्बन बँकेतील अनेक खातेदारांना सहाय्यक निबंध कार्यालयाकडून कर्ज परताव्यासाठी नोटीसा पाठविण्यात आल्याने खातेदारांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बँकेतील खातेदारांनी कोणतेही कर्ज न घेताही त्यांना नोटीसा पाठविण्यात आल्याने बँकेच्या कामकाजाविषयी संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बँकेने एका अधिकाऱ्याला निलंबित केले असून ज्या खातेदारांनी कर्जच घेतले नाहीत अशा खातेदारांना कर्ज परताव्याची नोटीस पाठवून विनाकारण आर्थिक आणि मानसिक त्रास देणाऱ्यांची चौकशी करून खातेदारांना पाठविलेल्या नोटीसा मागे घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ व त्यास संलग्न महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका वितरणास विलंब होत असल्याबाबत

**(२३) * ६०८७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ तसेच विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या गुणपत्रिका (Mark Sheets) मिळण्यास विलंब होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयाकडून विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांची कागदपत्रे वेळेवर न पोहोचणे, कागदपत्रे पोहोचली तरी गहाळ होणे, विद्यार्थ्यांचे अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीटसमध्ये (‘Academic Bank of Credits’ (ABC)) खाते नसणे, अशा विविध कारणांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका मिळत नाही परिणामी विद्यार्थ्यांना परीक्षा व मुल्यमापन मंडळाकडे वारंवार चकरा माराव्या लागत असूनही याकडे संबंधित विभाग परीक्षा व मुल्यामापन मंडळ जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याच्या तक्रारी वारंवार येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका वितरणात होणारा विलंब दूर करण्याबाबत शासन व मुंबई विद्यापीठाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्याचे ABC ID (Academic Bank of Credits) खाते असणे आवश्यक व बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ABC ID चे खाते तयार केले नाहीत, अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका विद्यापीठाकडे राखून ठेवल्या जातात. जेव्हा महाविद्यालयांकडून राखीव (RLE/RPV/RRA) निकालाबाबतची कार्यवाही (शैक्षणिक कागदपत्रे आणि मागील परीक्षेचा तपशील इत्यादी) पूर्ण होते, तेव्हा विद्यापीठाद्वारे अशा विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करून त्यांना गुणपत्रिका देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जऊळके खुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची नवीन इमारत बांधण्याबाबत

**(२४) * ५५२७ श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जऊळके खुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मॉडेल स्कूल) ही पूर्णपणे मोडकळीस आलेली असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा इयत्ता ७ वीपर्यंत असून त्यातील सुमारे ५ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असतानाही त्या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविले जात असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच सदर शाळेचे बांधकाम सन १९३८ साली करण्यात आले असून येत्या

काही वर्षांत या शाळेला ९० वर्षे पूर्ण होणार आहेत, शाळा पूर्णपणे धोकादायक स्थितीत असल्याने तिचे पुनर्निर्माण करून किमान १० वर्गखोल्यांची नवीन इमारत बांधून देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळेच्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे पुनर्निर्माण करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (वि.प.स.) यांनी मा.ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
जि.प. प्राथमिक शाळा जऊळके खुर्द ता.खेड ही १ ली ते ७ वी पर्यंतची शाळा असून एकूण पटसंख्या ५७ (मुले २५ व मुली ३२) आहे. एकूण ४ शिक्षक कार्यरत आहे.
शाळेच एकूण ७ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. त्यापैकी ३ वर्गखोल्या जुन्या असून सन १९३८ साली बांधण्यात आलेल्या आहेत. इतर ४ वर्गखोल्या सुस्थितीत आहेत. सुस्थितीत असलेल्या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थी बसवले जातात.उपलब्ध शिक्षक संख्येनुसार सुस्थितीतील पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध आहेत.
(३) शाळा व्यवस्थापन समिती, अध्यक्ष, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जऊळके खु. यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) जिल्हा नियोजन समिती सन २०२५-२६ अंतर्गत सदर शाळेच्या दुरूस्तीकामासाठी रुपये ६९.८४ लक्ष रूपये मंजूर असून वापरात असलेल्या वर्गखोल्यांची दुरूस्तीकाम करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वक्फ मंडळाच्या जमिनींवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(२५) * ५११८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वक्फ मंडळाच्या नोंदीनुसार ५२,६९९ हेक्टर वक्फ जमिनी असून त्यापैकी ६५ टक्के जमिनींवर अतिक्रमण झाल्यामुळे वक्फ संस्थांना मिळणारे उत्पन्न थांबले असून, अनाथ आश्रम, मदरसे, कब्रस्तान, दवाखाने, धार्मिक व शैक्षणिक संस्था यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असल्याने संबंधित विभाग, महसूल यंत्रणा तसेच वक्फ मंडळातील काही अधिकाऱ्यांच्या निष्क्रीयतेमुळे व दुर्लक्षामुळे या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होऊन शासकीय व वक्फ संस्थांच्या निधीचा गैरवापर होत असल्याचे दिसून येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वक्फ जमिनींविषयीची नोंद, नकाशे व कायदेशीर माहिती अद्ययावत नसल्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये भूमाफियांकडून बेकायदेशीर मालकी हक्क सांगण्यात येत असून त्यामुळे वाद निर्माण होत आहेत, या पार्श्वभूमीवर वक्फ जमिनींचे सर्वेक्षण, नोंदणी व व्यवस्थापन यासाठी 'GIS आधारित डिजिटलायझेशन' प्रणालीची आवश्यकता असल्याची बाब शासनाच्या त्याच दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वक्फ मंडळाच्या जमिनींवर होणाऱ्या अतिक्रमणाच्या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमिनीवरील अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत तसेच वक्फ जमिनींचे सर्वेक्षण, नोंदणी व व्यवस्थापन यासाठी ‘GIS आधारित डिजिटलायझेशन प्रणालीद्वारे करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) व (२) राज्यातील वक्फ मालमत्तांवरील मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली असल्याची बाब खरी आहे. सदरहू अतिक्रमणे ही बऱ्याच वर्षापासून असून सदर वक्फ मालमत्तांच्या मालकी हक्काबाबत वाद देखील उद्‌भवत आहेत. या सर्व बाबींवर उपाय करण्यासाठी तसेच वक्फ मालमत्तांची चर्तुसिमा निश्चित करुन त्यांचे उत्पन्न वाढवून भविष्यातील अतिक्रमणे रोखण्यासाठी राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे GIS Mapping करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर काम प्रगतीपथावर आहे.
(३) राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे GIS Mapping करण्याची कार्यवाही सुरु आहे. वक्फ मालमत्तांवर होत असलेली अतिक्रमणे हटविण्याबाबत वक्फ मंडळाकडून उम्मीद अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांना सन २०२४-२५ या वर्षाची पटसंख्या ग्राह्य धरून अनुदान मिळणेबाबत

**(२६) * ५३२३ श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शाळांना व वाढीव तुकड्यांना अनुदान मंजूर करण्याकरीता दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी शासन आदेश पारित केला असून, सदर आदेशानुसार शेवटच्या वर्गाची पटसंख्या ३० इतकी असणे अनिवार्य असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक शिक्षक गेले १५ ते २० वर्षे विनाअनुदान तत्वावर तुटपुंज्या पगारावरती ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे करीत आहेत, सन २०२३ मध्ये शेवटची पटसंख्या कमी असल्याने अशा शाळा अनुदानापासून वंचित राहिलेल्या आहेत परंतु सध्या अशा शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थी पटसंख्या वाढत असलेल्या व शेवटच्या वर्गाची पटसंख्या ही ३० पेक्षा जास्त असलेल्या व अनुदानापासून वंचित राहिलेल्या शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) राज्यातील “कायम” विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळांना अनुदान सूत्र लागू करण्यासाठी मूल्याकनांचे निकष प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर, २०११, शासन निर्णय दिनांक १६ जुलै, २०१३ अन्वये

तसेच उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांसाठी शासन निर्णय दिनांक ४ जून, २०१४ व शासन निर्णय दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार मुल्यांकनाकरीता शाळांची पात्रता तपासताना वेळोवेळी निश्चित केलेले किमान पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक आहे.

मुल्यांकनाच्या निकषानुसार पात्र शाळांना अनुदान वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येते. मुल्यांकनाच्या निकषांमध्ये शेवटच्या वर्गाची पटसंख्या ३० असणे, या निकषाचा समावेश असून त्यानुसारच आजपावेतो सर्व पात्र शाळांना व त्यावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांच्या कांदा पिकाला हमीभाव मिळण्याबाबत

**(२७) * ५१५६ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कांद्याला ३५ रुपये प्रति किलो हमीभाव मिळावा याकरिता व इतर मागण्यांसाठी शेतकरी आक्रोश कृती समितीतर्फे दिनांक १८ सप्टेंबर,२०२५ पासून मौ.कानगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथून धरणे आंदोलन सुरु करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी आक्रोश कृती समितीतर्फे बेमुदत धरणे आंदोलन, बेमुदत उपोषण, चक्रीय उपोषण,मार्केट बंद आंदोलन,रास्ता रोको, रेल्वे रोको,बोंबाबोंब आंदोलन अशी विविध प्रकारची आंदोलने, मागण्या मान्य होईपर्यंत करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.पणन मंत्री यांनी, "बाजारात कांद्याचे दर टिकून रहावे व त्याचा फायदा राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना व्हावा यासाठी केंद्र शासनाने कांदा निर्यातीला प्रोत्साहन देऊन निर्यात अनुदान दुप्पट करावे" अशी मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केली असून, याबाबत केंद्र शासनाकडे केलेल्या मागणीचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, शासनाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांदा निर्यातीला प्रोत्साहन देऊन निर्यात अनुदान दुप्पट करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

कांद्याच्या दरात होणाऱ्या घसरणीवर तातडीची उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय ग्राहक संरक्षण विभागास कांदा निर्यातदार शेतकऱ्यांना रोडटेप RODEP(Remission of Duties and Taxes on Export Products Scheme)योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदान १.९ टक्क्यांवरुन ४ टक्यांपर्यंत वाढविण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या स्तरावरुन दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनास विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापुरातील हॅण्डलुम उद्योगाला चालना मिळण्याबाबत

**(२८)** * **५२९३ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमेरिकेने लावलेल्या ५०% टॅरिफमुळे सोलापुरातील हॅण्डलूम गारमेंटला सुमारे २५० कोटींचा आर्थिक तोटा होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे तसेच सोलापुरात टेरी टॉवेल आणि गारमेंटचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून ते देशाबाहेर जाणाऱ्या टेरी टॉवेल आणि गारमेंट मधील २५% निर्यात ही एकट्या अमेरिकेत होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टेरी टॉवेलची वर्षभरातील एकूण निर्यात ८०० कोटी रुपये असून यातील २०० ते २२५ कोटी रुपयांची निर्यात अमेरिकेत होत असल्याने या टॅरिफ वाढीचा थेट परिणाम सोलापुरातील गारमेंट उद्योगावर होणार असल्यामुळे सोलापुरातील निर्यातदार उद्योजकांच्या उत्पादनावर परिणाम होऊन किमान १५ हजार रोजगार कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापुरातील हॅण्डलूम व गारमेंट उद्योगाला सावरण्यासाठी व निर्यात क्षमतेत घट होऊ नये म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यात हॅण्डलूम (हातमागावर) तयार होणारी उत्पादने स्थानिक बाजारात विक्री केली जातात. सोलापूरमधील गारमेंट युनिटमधून थेट निर्यात होत नाही. परंतु, सोलापूरमधील सुमारे १२ ते १५ गारमेंट युनिटमध्ये तयार होणारी उत्पादने मर्चंट एक्सपोर्टमार्फत अमेरिकेला निर्यात केली जात होती. सदर मर्चंट एक्सपोर्टव्दारे मिळणारे काम पूर्णतः थांबलेले आहे. सोलापूरातील यंत्रमागावर टेरी टॉवेलचे उत्पादन होते. त्या उत्पादनापैकी सुमारे २५% उत्पादन अमेरिकेला निर्यात होत असल्याचे सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघ यांनी कळविलेले आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.

सोलापूरातील टेरी टॉवेल उत्पादनाच्या एकूण मुल्य रूपये ८०० कोटीपैकी २०० कोटी रूपयांची निर्यात अमेरिकेत होत असल्याचे सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघ यांनी कळविलेले आहे. टॅरिफ वाढीमुळे सोलापूरातील गारमेंट क्षेत्रातील किती रोजगार कमी झाला याबाबतची निश्चित आकडेवारी सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघ, सोलापूर/ प्रादेशिक उपायुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर/ वस्त्रोद्योग आयुक्तालयात उपलब्ध नाही.
(३) जागतिक आयात शुल्क बदलांचा राज्याच्या निर्यातक्षम उद्योगावर होणाऱ्या परिणामांबाबत अभ्यास करणे व उपाययोजना सुचविण्यासाठी श्री.अपूर्व चंद्रा (भा.प्र.से., सेवानिवृत्त), केंद्रीय संरक्षण विभागाचे प्रमुख सल्लागार, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली उद्योग विभागाच्या दिनांक १८/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती खालील बाबींवर शासनास शिफारशी करणार आहे-

i. राज्यातील उद्योग घटकांना निर्यात करण्यात येणाऱ्या अडचणी.
ii. निर्यातक्षम उद्योगांना निर्यात वृद्धीच्या अनुषंगाने उपाययोजना.
iii. निर्यातक्षम सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना निर्यात करण्यासाठी विशेष प्रोत्साहने.

iv. निर्यातक्षम उद्योगांसाठी पर्यायी बाजारपेठ उपलब्धतेबाबत माहिती पुरविणे.

v. प्रचलित निर्यात धोरणांमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने आढावा.

vi. अमेरिकेने आकारलेल्या करप्रणालीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून तातडीच्या, मध्यमकालीन व दीर्घकालीन उपाययोजना सुचविणे.

vii. Decriminalization, Deregulation, EoDB (Ease of Doing Business), Self Certification for Low risk, Non Hazardous, Non- Polluting and all the green Category industries for building plan approval & MPCB Consent to Establish & Operate याबाबत देखील आढावा घेऊन मार्गदर्शन.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बँक ऑफ बडोदा (ता.उमरी, जि.नांदेड) शाखेकडून शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी अनुदानाचे पैसे परस्पर कर्ज खात्यात जमा केल्याबाबत

**(२९) * ५८५८ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिवृष्टीच्या अनुदानाच्या रकमेतून कसल्याही प्रकारची कर्ज वसूली करु नये किंवा शेतकऱ्यांच्या बँक खात्याला होल्ड लावू नये अशा प्रकारच्या सूचना शासनाने देऊनही बँक ऑफ बडोदा (ता.उमरी, जि.नांदेड) येथील शाखेमध्ये शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी अनुदानाचे पैसे परस्पर कर्ज खात्यात जमा करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासनाचे आदेश झुगारुन मनमानी कारभार करणाऱ्या बँक ऑफ बडोदा (ता.उमरी, जि.नांदेड) येथील शाखेमध्ये शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी अनुदानाचे पैसे परस्पर कर्ज खात्यात जमा करण्यात येणाऱ्या बँकेवर व शाखा व्यवस्थापकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) बँक ऑफ बडोदा, शाखा उमरी पेठ, ता.उमरी, जि.नांदेड या बँकेमध्ये ज्या शेतकऱ्यांनी त्यांचे आधार कार्ड थेट लाभ हस्तांतरणाकरीता (DBT) के.सी.सी. खात्याशी संलग्न केले होते त्यांची शासकीय नुकसान भरपाईची रक्कम के.सी.सी. खात्यात जमा झाली आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांचे आधार कार्ड बचत खात्याशी संलग्न होते त्या शेतकऱ्यांची शासकीय नुकसान भरपाईची रक्कम बचत खात्यामध्ये जमा झाली आहे. सदर प्रक्रिया पूर्णपणे आधार संलग्न DBT प्रणालीची स्वयंचलित कार्यपध्दती आहे. थेट लाभ हस्तांतरणाची रक्कम केसीसी तसेच बचत खात्यांमध्ये थेट जमा होणे हे संबंधित बँकेच्या शाखा व्यवस्थापकाच्या कोणत्याही वैयक्तीक निर्णयामुळे झालेली नाही. सदर प्रक्रिया ही स्वयंचलित स्वरुपाची आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण महाराष्ट्रातील उद्योग आणि कृषी क्षेत्रातील विविध वस्तूंच्या निर्यातीबाबत

**(३०) * ५६७३ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय वस्तूवरील आयात शुल्क मोठ्या प्रमाणात वाढविण्याच्या अमेरिकेच्या निर्णयामुळे दक्षिण महाराष्ट्रातील उद्योग आणि कृषी क्षेत्राला आर्थिक फटका बसणार असल्याने कोल्हापूर आणि सांगलीतून पाठवले जाणारे वाहनाचे सुट्टे भाग, कापड, बेदाणे,हळद यासह विविध वस्तूंच्या निर्यातीवर याचा थेट परिणाम होणार असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे दक्षिण महाराष्ट्राचे उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्राचे तब्बल रुपये ५००० कोटींपेक्षा जास्त आर्थिक नुकसान होण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली असल्यामुळे संबंधित शेतकरी व उद्योजक वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली तसेच शेजारच्या सोलापूर जिल्ह्यातून अमेरिकेला विविध वस्तूंची निर्यात होते, कोल्हापुरात फाउंड्री उद्योग फार मोठ्या प्रमाणात असून केवळ कोल्हापुरातून ३,८६४ कोटी रुपयांची निर्यात एकट्या अमेरिकेला दोन वर्षातून होत असल्याने येथील उद्योगावर विपरीत परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दक्षिण महाराष्ट्रातील उद्योगांना व कृषी क्षेत्रांना आर्थिक मदत देण्यासाठी उद्योग आणि कृषी विभागाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) व (२) दिनांक २७/०८/२०२५ पासून अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क ५०% पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, १४/११/२०२५ रोजी ताजी फळे व मसाल्याच्या पदार्थावरील आयातशुल्क रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे हळदीच्या निर्यातीवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही. देशाच्या बेदाणा निर्यातीमध्ये अमेरिका येथे होणारी निर्यात ही १% पेक्षा कमी असल्याने, आयात शुल्क वाढीचा त्यावर नगण्य परिणाम होईल. जागतिक आयात शुल्क बदलांचा राज्याच्या निर्यातक्षम उद्योगांवर होणाऱ्या परिणामांबाबत अभ्यास करण्यास व उपाययोजना सुचविण्यासाठी मा.श्री.अपूर्व चंद्र, (सेवानिवृत्त भा.प्र.से) यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाच्या दिनांक १८/०८/२०२५ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. राज्याची निर्यातक्षेत्रातील कामगिरी वाढवून सन २०२८ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था U.S $ १ ट्रिलियन एवढी साध्य करण्याकरीता राज्यामध्ये निर्यात प्रोत्साहन विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती व बळकटीकरण करणे, निर्यातदार तसेच निर्यातक्षम घटकांसाठी निवडक प्रोत्साहने देणेकरीता शासनाने महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३ दिनांक २२/११/ २०२३ जाहीर केले आहे.
(३) सदर बाबत कोणतेही निवेदन मुख्यालय/ जिल्हा कार्यालयाकडे औद्योगिक संघटना अथवा चेंबर ऑफ कॉमर्स कडून प्राप्त झालेले नाही. तथापि, कोल्हापुरात फाउंड्री व ॲटो पार्ट्स उद्योग घटकांच्या गेल्या दोन वर्षातून अमेरिकेस झालेल्या निर्यातीबाबतची केंद्र शासनाच्या वाणिज्य व उद्योग विभागाअंतर्गत Director General of Commercial Intelligence and Statistics (DGCIS) यांचेकडील उपलब्ध माहितीनुसार कोल्हापुर जिल्ह्यातून सन २०२३-२०२४ मध्ये अमेरिकेत रुपये १५७.४३ कोटी व इतर देशात रुपये ३००.३५ कोटी अशी एकूण रुपये ४५७.७८ कोटी (एप्रिल ते मार्च) तसेच, सन २०२४-२०२५ मध्ये अमेरिकेत रुपये १५४.७६ कोटी व इतर देशात रुपये ३५४.११ कोटी अशी एकूण रुपये ५०८.८७ कोटी निर्यात झालेली आहे. (एप्रिल ते मार्च) तर सन २०२५- २६ मध्ये जून २०२५ अखेर अमेरिकेत रुपये ४१.९६ कोटी

व इतर देशात रुपये ८१.१६ कोटी अशी रुपये १२३.१२ कोटी निर्यात झालेली आहे. (एप्रिल ते जून) तसेच, सांगली जिल्ह्यातून सन २०२४-२०२५ मध्ये ऑटो कंपोनेंट वस्तूची अमेरिकेत रुपये ९९.९६ कोटी व टेक्सटाईल ची रुपये ४.७१ कोटी अशी एकूण रुपये १०४.६७ कोटी निर्यात झालेली आहे. (एप्रिल ते मार्च) सन २०२५- २६, एप्रिल २०२५ अखेर ऑटो कंपोनेंट वस्तूची अमेरिकेत रुपये २०.०५ कोटी व टेक्सटाईल ची रुपये ०.२४ कोटी अशी रुपये २०.२९ कोटी निर्यात झालेली आहे.
(४) आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेला जागतिक व्यापार तणाव आणि नवीन आयात शुल्क धोरण यामुळे राज्यातील प्रमुख उद्योग प्रभावित होत आहेत. दिनांक १० ऑगस्ट २०२५ पासून, अमेरिकेने ५० टक्के कर रचना लागू केली आहे. तसेच आणखी २५ टक्के दंडात्मक कर लागू करण्यात आला आहे. यासाठी जागतिक आयात शुल्क बदलांचा राज्याच्या निर्यातक्षम उद्योगांवर होणाऱ्या परिणामांबाबत अभ्यास करणे व उपायायोजना सुचविण्यासाठी राज्य शासनामार्फत शासन निर्णय क्र. साप्रोयो २०२५ / प्र.क्र.२८७/उद्योग-८ दिनांक १८ ऑगस्ट २०२५ अन्वये राज्य स्तरीय समिती मा.श्री.अपूर्व चंद्र (भा.प्र.से सेवानिवृत्त), केंद्रीय संरक्षण विभागाचे प्रमुख सल्लागार यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण-२०२३, शासन निर्णयानुसार वेगवेगळे लाभ अनुज्ञेय आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाबार्ड अंतर्गत सिंचन प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत

**(३१) * ५४५३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाबार्ड अंतर्गत होणाऱ्या सिंचन प्रकल्पाचे नियोजन, मंजुरी आणि कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री महोदयांनी नाबार्डच्या अधिकाऱ्यांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२५-२०२६ व २०२६-२०२७ मध्ये पूर्ण होणाऱ्या सर्व प्रकल्पांची कामे एक वर्षात पूर्ण करण्याबाबतचे नियोजन करण्यात आले आहे, या नियोजनानुसार आवश्यक त्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बॅरेज बांधण्याचे रूपांतरन करण्यासाठीचा प्रस्तावही सादर करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री महोदयांनी प्रशासनाला दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नियोजनानुसार सन २०२५-२०२६ व २०२६-२०२७ मध्ये पश्चिम महाराष्ट्रातील सर्व अपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, अंशतः खरे आहे.

नाबार्ड अंतर्गत होणाऱ्या सिंचन प्रकल्पाचे नियोजन मंजुरी आणि कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांनी दिनांक ११/०९/२०२५ रोजी

संपन्न झालेल्या बैठकीत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

(२) जलसंपदा विभागांतर्गत ७५ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे व १५५ पूर्ण प्रकल्पांच्या वितरणप्रणाली मध्ये सुधारणा करणेसाठी रुपये १५,००० कोटीपैकी प्रथम टप्प्यातील रुपये ७,५०० कोटीचे दीर्घ मुदतीचे कर्ज नाबार्ड कडून घेण्याबाबत दिनांक ११/०३/२०२४ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

या रुपये ७,५०० कोटींपैकी रुपये ५,००० कोटी ७५ अपूर्ण सिंचन प्रकल्पांपैकी प्रथम टप्प्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आणि रुपये २,५०० कोटी १५५ सिंचन प्रकल्पांपैकी प्रथम टप्प्यातील कालवे व वितरण प्रणाली मध्ये सुधारणा करणे या कामासाठी वापरण्याचे नियोजित आहे.

प्रथम टप्प्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आणि कालवे व वितरण प्रणाली मध्ये सुधारणा करणे ही कामे दोन ते तीन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

आगामी दोन वर्षात बांधकामाधील प्रकल्प पूर्ण करणे व पूर्ण झालेल्या प्रकल्पांचे दुरुस्ती करणे या संदर्भात नियोजन, कृति आराखडा व आवश्यक निधीच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या तसेच, कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतर करणे या कामांना दुरुस्तीच्या कामांमध्ये घेऊन नाबार्ड अंतर्गत कर्ज सहाय्यासाठी प्रस्तवित करण्याच्या सूचना मा.मंत्री महोदयांनी दिनांक ११/०९/२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) पश्चिम महाराष्ट्रातील अपूर्ण प्रकल्पांना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, बळीराजा जलसंजीवनी योजना, नाबार्ड (RIDF) च्या विविध मालिके अंतर्गत तसेच, नाबार्ड (NIDA) अंतर्गत कर्ज सहाय्य इ. विविध स्त्रोतातून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने आगामी कालावधीत विविध स्त्रोतातून निधी उपलब्ध करून प्रकल्प पूर्ण करण्यास शासन प्रयत्नशील आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना बंद केल्याबाबत

**(३२) * ५१३३ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेतून आतापर्यंत ९ लाख ३४ हजार तरुणांनी विविध शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये कार्यप्रशिक्षण घेतले असून, या योजनेंतर्गत दरमाह मानधन देण्यात येत होते, परंतु ही योजना अचानक बंद करण्यात आल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना बंद झाल्यामुळे लाखो तरुण पुन्हा बेरोजगार झाले असून, त्यांना दिलासा मिळण्याऐवजी शिक्षण व कार्यानुभवानंतरही रोजगाराची हमी न मिळाल्याने संतप्त प्रशिक्षणार्थ्यांनी नागपूर येथे संविधान चौकात आंदोलन केल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी नोकरीत समाविष्ट करावे, मानधन दुप्पट वाढवावे आणि प्रशिक्षणकाळानंतर निश्चित रोजगार द्यावा या मागण्या मान्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही सुरू केली आहे,

(४) असल्यास, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना बंद करण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व प्रशिक्षणार्थ्यांना दिलेल्या आश्वासनांप्रमाणे भविष्यात कार्यवाही होण्यासाठी

शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेची अंमलबजावणी सुरु असून सदर योजनेंतर्गत दिनांक २०/११/२०२५ अखेर रुजू झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या १,१६,३८४ इतकी आहे.
(२) प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरुपी रोजगार व इतर मागण्यांकरीता नागपूर येथील संविधान चौकात दिनांक २५/०८/२०२५ आंदोलन करण्यात आले होते.
(३) व (४) मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील युवकांना शासकीय /निमशासकीय /खाजगी आस्थापनांत ११ महिन्यांकरीता कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार विद्यावेतन अदा करण्यात येते. सदर योजना ही नियमित नियुक्तीसाठी नसून युवकांना रोजगारसक्षम करण्यासाठी प्रशिक्षणाची संधी आहे. सद्य:स्थितीत योजनेची अंमलबजावणी सुरु असून योजनेंतर्गत ११ महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर कार्यरत प्रशिक्षणार्थ्यांच्या जागी नवीन उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(३३) * ५१५७ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१८ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, राज्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून दहावीपर्यंत मराठी भाषा शिकविणे बंधनकारक असूनही सन २०२० पासून हा नियम राज्य मंडळाव्यतिरिक्त इतर सर्व परीक्षा मंडळांनाही लागू करण्यात आला असून प्रत्यक्षात या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक केंद्रीय विद्यालयांसारख्या नामांकित शाळेतून मराठी विषय ऐच्छिक स्वरुपात ठेवला जातो किंवा पूर्ण टाळला जात असल्याने ८५ हजार ४९७ विद्यार्थी मराठी भाषा विषय शिकण्यापासून वंचित असल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पहिलीपासून दहावीपर्यंत मराठी भाषा हा विषय अनिवार्य असतानाही त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यातील सर्‌व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक यांना निर्देश देण्यात आले आहेत.

मराठी भाषा विषय सक्तीची अंमलबजावणी प्रभावीपणे होते किंवा कसे याची खात्री करण्याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, राज्यमंडळाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा विषय सक्तीची प्रभावी

अंमलबजावणी होत असल्याचे आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी विविध क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीच्या आधारे, शासनास दिनांक ०१/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) ज्या शाळांमध्ये मराठी भाषा विषय शिकविला जात नाही अशा शाळेची मान्यता किंवा ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याबाबतची तरतूद मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबतच्या अधिनियमातील कलम ४ मध्ये करण्यात आली आहे. राज्यमंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळांच्या शाळांमध्ये सदर धोरणाची अंमलबजावणी होत नसेल तर अशा शाळेवर कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्या स्तरावरून सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.